<u>नि.क्र.२३ वरील आदेश.</u>

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.३ तर्फे दाखल करणेत आलेला असून त्याव्दारे त्यांचे विरुध्द झालेला " एकतर्फा विना कैफियत" चा आदेश रद्द होवून प्रतिवादी क्र.३ यांना दाव्याचे कामी 'कैफियत' दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी विनंती अर्ज केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.३ यांनी प्रस्तुत अर्जात असे नमुद केले आहे की, त्यांना दाव्याचे समन्स ते रहात असलेल्या पत्यावर बजावण्यात आलेले नाही. त्यामुळे त्यांना दाव्याविषयी माहिती नव्हती. प्रतिवादीविरुध्द प्रस्तुत दाव्यात जाहीर समन्स काढण्यात आलेले होते व त्या आधारे प्रतिवादी क्र.३ विरुध्द एकतर्फा दावा चालविण्याबाबतचा आदेश झालेला आहे. प्रतिवादी यास सदरची बाब समजल्यानंतर प्रतिवादी क्र.३ याने प्रस्तुतचा अर्ज केलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजुर झाल्यास वादीचे काहीएक नुकसान होणार नाही. दावेचे अंतिम निकालाकरीता प्रतिवादीचे म्हणणे घेणे अत्यत आवश्यक असणार आहे व त्यामुळे न्यायदानास मदतच होणार आहे. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर होणेस विनंती केली आहे.

३. वादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जातील कथने नाकारलेली आहेत व असे कथन केलेले आहे की, प्रतिवादी क्र.३ यास ज्या पत्यावर समन्स काढण्यात आलेले होते त्याच पत्यावर जाहीर समन्स काढण्यात आलेले आहे आणि जाहीर समन्स काढल्यानंतरही प्रतिवादी क्र.३ हे हजर न झाल्याने त्याच्याविरुध्द एकतर्फा आदेश झालेला आहे. वास्तविक मूळ समन्स व जाहीर समन्स यातील प्रतिवादी क्र.३ याचा पत्ता एकच आहे. सदर बाबीतून प्रतिवादी हे हेतुपुरस्सर दाव्याचे समन्स घेण्यास टाळाटाळ करीत आहेत हे स्पष्ट होत आहे. प्रतिवादी यांना दाव्याचे कामकाजात विलंब करावयाचा आहे. सबब अर्जात कोणतेही योग्य व संयुक्तीक कारण नमूद नसल्याने सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा ही विनंती.

४. उभय पक्षांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रस्तुतकामी प्रतिवादी क्र.३ यांना समन्स (नि.क्र.९ ) अन्वये दि.१६/११/२०१६ समन्स पाठविले होते. परंतु सदरचे समन्स त्यांना लागू न झाल्याचे बेलीफ रिपोर्टवरुन दिसून येते. त्यानंतर वादी यांनी दि.३०/५/२०१७ रोजीच्या दैनिक जनप्रवासमध्ये जाहीर समन्स प्रसिध्द केले. तद्नंतरही प्रतिवादी क्र.३ हे दाव्याकामी हजर होवुनही त्यांनी मुदतीत दाव्यास कैफियत दाखल केलेली नाही. तसेच प्रतिवादी नं.३ यांनी

त्यांना कैफियत दाखल करणेस झालेल्या विलंबाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा हजर केलेला नाही. मात्र प्रतिवादी क्र.३ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारली तर त्यांचा महत्वपूर्ण हक्क नाकारल्यासारखे होईल. प्रतिवादी क्र.३ यांना म्हणणे मांडण्याची संधी दिल्यास नैसर्गिक न्यायतत्वाने प्रस्तुत दावा गुणदोषावर निकाली काढण्यास मदत होणार आहे. न्यायालयीन कार्यपध्दतीचे कायदे हे न्यायाच्या हेतूस्तव बनविण्यात आलेले असतात. प्रस्तुत दाव्यामध्ये वादींना झालेली गैरसोय ही खर्चाच्या माध्यमातून भरुन काढता येण्यासारखी आहे. वरील नमूद सर्व कारणांचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.३ यांनी वादींना र.₹१,०००/- अर्जाचा खर्च म्हणुन देणेच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. खर्चाची रक्कम अदा केलेनंतर प्रतिवादी क्र.३ यांची कैफियत अभिलेखावर घेणेत यावी.

सही/-
(व्ही.पी.शिंदे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
जयसिंगपूर

दिनांक – ०५.०६.२०१८

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri.R.L.Mane. |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 05/06/2018. |
| Judgment/order signed by the PO on | 05/06/2018. |
| Judgment/order uploaded on | 19/06/2018. |